# पर्यायी शिक्षण

**प्रस्तावना :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ लागू करण्यात आला आहे. सदर कायदयाच्या अनुषंगाने राज्य नियमावली २०११ तयार केली असून ती दिनांक ११ ऑक्टोंबर २०११ पासून राज्यात लागू केली आहे. त्यामधील तरतूदीनूसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालक प्राथमिक शाळेत दाखल केले पाहिजे. परंतु हयामध्ये स्थलांतर तसेच आजारपण, वय जादा यांसारख्या कारणांमूळे मुले शाळाबाहय होतात. यासाठी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत पुढील योजना सुरु आहेत.

## हंगामी निवासी वसतिगृह [Seasonal Hostel] :

सर्व साधारणपणे ऑक्टोंबर ते मार्च या कालावधीमध्ये वीटभटटी, ऊसतोड कामगार आपल्या पाल्यांसोबत स्थलांतरीत होत असतात व त्यामूळे शाळाबाहय होतात म्हणून अशा विद्यार्थ्यांसाठी स्थलांतर होऊ नये म्हणून शालेय हंगामी निवासाची व जेवणाची सोय करण्यात येते.